सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,नाशिक,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**
दुरध्वनी क्र. ०२५३-२३१५०८०/२३१७१५१ E-Mail- ddmanashik@gmail.com फॅक्स क्र.०२५३- २५८१७००

**सुधारित आदेश..**

**वाचा :** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. करोना २०२० /प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०

३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

४. या कार्यालयाचा आदेश क्र. कक्ष/कोरोना विषाणू /१२७/२०२० दिनांक २१/०३/२०२० अन्वये.

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
**क्र.कक्ष/ कोरोना विषाणू/१२८/२०२०**
**नाशिक दिनांक :-२१/०३/२०२०**

**आदेश**

ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय २ अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय ३ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय २ अन्वये प्रसिद्धी केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

त्या अर्थी राज्य शासनाचे संदर्भीय २ अन्वये विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **मी सुरज मांढरे, जिल्हाधिकारी ,नाशिक दिनांक २१ मार्च २०२० पासून एफएल -१ ( ठोक विदेशी मद्य विक्री अनुज्ञप्ती ) सीएल-२ ( ठोक देशी मद्य विक्री अनुज्ञप्त्या ), सर्व किरकोळ मद्य विक्रीच्या एफएल -२, सीएल / एफएल / टीओडी-३, सीएल-३, एफएल-३, एफएल-४ ( क्लब अनुज्ञप्ती) एफएल/बीआर -२ व ताडी अनुज्ञप्ती, एफएल/डब्ल्यू-१ व एफएल/डब्ल्यू- २ तसेच सर्व अबकारी अनुज्ञप्त्या सायंकाळी ०६.०० वाजे नंतर पुढील आदेश होईपर्यंत बंद करण्याचे आदेश पारित करीत आहे.** या पार्श्वभूमीवर **जिल्ह्यातील सर्व उक्त नमूद सर्व प्रकारचे मद्य विक्री व शॉप बंद करण्याचे आदेश देत आहे.**

तरी उपरोक्त निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंडसंहिता १८६० (४५) याच्या कलम १८८ शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**(सुरज मांढरे, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**प्रती -** १. मा. पोलीस आयुक्त , नाशिक शहर यांना पुढील कार्यवाहीसाठी .

二. पोलीस अधीक्षक , ग्रामीण पोलीस , नाशिक यांना पुढील कार्यवाहीसाठी.

三. अधिक्षक, राज्य उत्पादक शुल्क , नाशिक माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

**प्रत-** १. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर